आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१५ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- ७८व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचा सर्वत्र उत्साह
- १४० कोटी देशवासी एकजुटीनं २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करतील असा प्रधानमंत्र्यांना विश्वास/ देशात समान नागरी कायद्यावर व्यापक चर्चेची गरज असल्याचं स्वातंत्र्यदिन सोहळ्यात केलं प्रतिपादन
- येत्या पाच वर्षांत वैद्यकीय शिक्षणासाठी ७५ हजार नव्या जागा मिळणार.
- महाराष्ट्र शासन राज्याचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही.

  **आणि**
- सक्तवसुली संचालनालयाच्या पूर्णवेळ संचालकपदी राहुल नवीन यांची नियुक्ती

**<><><><><>**

७८वा स्वातंत्र्यदिन आज देशभरात उत्साहाने साजरा होत आहे. सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधे सरकारी-निमसरकारी कार्यालयं, लोकप्रतिनिधीगृहं, न्यायालयं, सहकारी संस्था, शाळा महाविद्यालयं तसंच अनेक संवयंसेवी संस्था संघटनांनी ध्वजारोहणाचे कार्यक्रम आयोजित केले होते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आयुष्य वेचणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना तसंच देशाच्या सीमांचं रक्षण करणाऱ्या जवानांप्रति आदर भावना व्यक्त करीत आणि राष्ट्रगीत म्हणत साऱ्या देशाने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. बाजारपेठांमधे तिरंगा झेंड्याच्या लहानमोठ्या प्रतिकृती जिकडेतिकडे दिसत आहेत. अनेक ठिकाणी दुकानं, इमारती, रस्ते यावर तिरंगी सजावट करण्यात आली आहे.

**<><><><><>**

देशातले १४० कोटी नागरिक एकजुटीने वागले तर, प्रत्येक आव्हानावर मात करत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्राचं स्वप्न साकार होऊ शकेल असं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त सलग ११व्यांदा मोदी यांनी लाल किल्ल्यावर तिरंगा फडकावला, त्यानंतर ते देशाला संबोधित करत होते. विकसित भारतात सर्वसामान्यांच्या जगण्यात सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असावा, आणि लोकांना गरज असेल तेव्हाच सरकारने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.
समान नागरी कायद्याची आवश्यकता असल्याचं मत सर्वोच्च न्यायालयानं सातत्यानं  मांडलं असून यावर व्यापक चर्चा होण्याची गरज आहे असं ते म्हणाले. प्रत्येक धर्माचे वेगवेगळे वैयक्तिक कायदे असल्यावर समाजात फूट पडते, म्हणून धर्मनिरपेक्ष नागरी कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधली दरी कमी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देशात वारंवार निवडणुका होत राहिल्या तर, प्रत्येक विकासकामाकडे निवडणुकांच्या अनुषंगानेच पाहिलं जातं, म्हणून  एक देश, एक निवडणूक संकल्पना राबवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा असं ते म्हणाले.

भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा प्रामाणिकपणे सुरू ठेवण्याची ग्वाही त्यांनी लाल किल्ल्यावरून दिली. निराशेच्या गर्तेत बुडालेल्या काही लोकांच्या विचारसरणीमुळे देशाचं मोठं नुकसान होत असून, त्यांच्यामुळे देशाच्या होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याकरता अनेक वर्षे लागतात, त्यामुळे अशा लोकांपासून आपण सावध राहायला हवं असं ते म्हणाले.

देशातल्या परिवर्तनाचा सर्वाधिक लाभ हा इथल्या वंचित घटकांपर्यंत पोहोचला असून, देशाचा सर्वांगीण विकास हेच आपल्या सरकारच्या धोरणं आणि

कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी असल्याचं त्यानी सांगितलं. आजवरच्या प्रयत्नांमुळे देशाचं दरडोई उत्पन्न दुप्पट करण्यात सरकारला यश आल्याचंही ते यावेळी म्हणाले.

देशातल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जाण्याची गरज पडू नये, आणि त्या कारणापोटी मध्यमवर्गीयांवर खर्चाचा बोजा पडू नये याकरता येत्या पाच वर्षांत वैद्यकीय प्रवेशाच्या ७५ हजार नव्या जागा तयार करण्याची घोषणाही त्यांनी केली.

आपण कोणत्याही राजकीय भावनेतून नाही तर राष्ट्र प्रथम या भावनेतूनच देशात सुधारणा घडवून आणल्या. बँकिंग क्षेत्रातल्या सुधारणा हे त्याचेच उदाहरण असून, आज भारतीय बँका जगातल्या सर्वात मजबूत बँकांपैकी एक बनल्या असल्याचं ते म्हणाले.

चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या अनुषंगानं देशात कौशल्यविकास घडवून आणण्याचा, आणि या माध्यमातून भारताच्या कुशल मनुष्यबळाची ताकद जागतिक रोजगाराच्या बाजापेठेत दाखवून देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

आधुनिक काळाची गरज ओळखून विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रावर भर देत आपलं सरकार संशोधनाला पाठबळ देत असल्याचं त्यांनी सांगितलं.

सरकार कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी काम करत असून, येत्या काळात जगाची सेंद्रीय खाद्यान्नाची मागणी पूर्ण करणारा देश म्हणून भारताची ओळख प्रस्थापित करण्याचा मानसी त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**बाईट- प्रधानमंत्री**

यावेळी प्रधानमंत्र्यांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसह विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचाही आढावा घेतला.

या कार्यक्रमाला देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. हवाई दलाच्या हेलिकॉप्टर्सनी ध्वजारोहणाच्या वेळी पुष्पवृष्टी केली. ध्वजवंदनेच्या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राजघाटावर जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या अमरज्योती शहीद स्मारकावर आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

७८व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीतकुमार सेहगल याच्या हस्ते आज नवी दिल्लीतल्या दूरदर्शन भवनात ध्वजारोहण करण्यात आलं.

आकाशवाणीच्या महासंचालक मौशुमी चक्रवर्ती यांच्या हस्ते नवी दिल्लीतल्या आकाशवाणी परिसरात ध्वजारोहण झालं. आकाशवाणी मुंबईच्या नवीन प्रसारणभवनातही ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला.

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनानिमित्त उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. स्वातंत्र्य दिन हा न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या आदर्शांचा उत्सव असून जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचा पाया आहे, असं धनखड आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले. सर्व नागरिकांना २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याचं आवाहनही धनखड यांनी या संदेशातून केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या संकल्पाचं प्रतिबिंब दिसतं, असं मत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केलं आहे. सशक्त भारत उभा करण्याची शपथ सर्व भारतीयांनी घेण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र स्वातंत्र्यदिन उत्साहाने साजरा करण्यात येत आहे.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी पुण्यातल्या राजभवनात राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. राज्यपालांनी उपस्थित लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मुंबईत मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

राज्य शासन राज्याचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे. असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं...

**होल्ड -- बाईट -- मुख्यमंत्री**

ते म्हणाले की, विविध योजनांच्या माध्यमातून विकासाला चालना देण्याचं काम सुरु आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळायला सुरुवात झाली असून युवकांना रोजगारासाठी प्रशिक्षण, विद्यावेतन, गोरगरीब, दुर्बलांना वर्षातून तीन मोफत गॅस सिलेंडर, शेतकऱ्यांना वीज सवलत, मुलीना संपूर्ण व्यवसायिक शिक्षण मोफत अशा अनेक योजना सुरु केल्याचंही त्यांनी सांगितले.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी मान्यवर उपस्थित होते.
**मुंबई उपनगर** जिल्हाधिकारी कार्यालयात मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते **नागपूर** मध्ये ध्वजारोहण झालं.

**छत्रपती संभाजीनगर** इथं विभागीय आयुक्त कार्यालयात राज्याचे अल्पसंख्यांक विकास मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

**बीड**मध्ये राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला.

**पालघर** जिल्हाधिकारी कार्यालयात पालक मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. **भंडारा** इथं पोलिस कवायती मैदानात पालकमंत्री विजयकुमार गावीत यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले. **यवतमाळ** इथं पालकमंत्री संजय राठोड आणि **गोंदियात** पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या ध्वजारोहण करण्यात आलं.

**कोल्हापूर** इथं पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते तर **सातारा** इथल्या जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते आणि **सांगली** इथं कामगार मंत्री तथा पालकमंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. **अहमदनगर** जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पोलीस परेड मैदानावर मुख्य ध्वजारोहण करण्यात आलं. **धाराशीव** मध्ये आरोग्यमंत्री डॉक्टर तानाजी सावंत तर **जालना** इथं पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. **धुळ्यात** पालकमंत्री गिरीष महाजन आणि **जळगावात** पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

**लातूरचे** मुख्य शासकीय ध्वजारोहण क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते झालं.

**रत्नागिरी** जिल्ह्याचा ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय सोहळा पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते तर **सिंधुदुर्गनगरी** इथं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. **चंद्रपुरात** पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी तिरंगा फडकावला. **नंदुरबार** मध्ये पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

**<><><><><>**

शेतकरी, कामगार आणि जवानांनी हा देश उभा केला असून देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दूरदृष्टीमुळे देशाच्या प्रगतीचा पाया रचला गेला, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. मुंबईत टिळक भवन मुख्यालयात नाना पटोले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी काँग्रेसने मोठा संघर्ष केला तसंच नेहरूंनी यासाठी अनेक वर्षे तुरुंगवास भोगला याची आठवणही पटोले यांनी करून दिली.

**<><><><><>**

जेष्ठ महसुली अधिकारी राहुल नवीन यांची सक्तवसुली संचालनालयाच्या पूर्णवेळ संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नेमणूक समितीनं त्यांच्या नावाला मंजुरी दिली आहे. सध्या राहुल नवीन हे इडीचे विशेष संचालक म्हणून कार्यरत आहेत त्यांनी नवी नियुक्ती २ वर्षांसाठी असेल.

**<><><><><>**

मुंबईच्या हद्दीवर ऐरोली टोलनाका इथं २ कोटी रुपये किमतीचा अमली पदार्थांचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर नाकाबंदी दरम्यान एका कारमधे आढळलेल्या संशयास्पद पदार्थाची तपासणी केल्यावर तो मेफेड्रोन असल्याचं निष्पन्न झालं. वाहनचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्याच्याकडून २ किलो २९ ग्रॅम एमडी जप्त केलं आहे.

**//<><><><><>//**